दै. गोदातीर दि. 05/09/24

# कत्तलीसाठी जाणारे १७ बैलांसह वाहन जप्त



नांदेड- ऑपरेशन 'फ्लश ऑऊट' अंतर्गत भाग्यनगर पोलिसांनी कारवाई करत अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या १७ गोवंशाना जीवदान दिले. त्यानंतर गोशाळेत दाखल करुन वाहन आणि चालकास ताब्यात घेतले.

दि.४ सप्टेंबर रोजी रात्री पावणे दोन वाजता गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक केजगीर यांच्या मार्गदर्शनाखाली अमलदार माळवे, पठाण यांनी पुर्णाहून नांदेडकडे येणाऱ्या एका वाहनाला जय भवानी चौकाजवळ ताब्यात घेतले. या वाहनात अवैध कत्तलीसाठी गोवंशीय १७ बैल आढळून आले.

गाडीचालक शेख अय्युब शेख युसुफ रा. चौपाल मोहल्ला नशीराबाद ता. जि. जळगाव, गाडीचा क्लीनर फरीद नबी कुरेशी रा. वाघारी ता. जामनेर जि. जळगाव, गाडीचा हेल्पर शेख मुक्तार शेख अब्बास रा. आयशानगर ६५ मालेगाव ता.जि. नाशीक., बैलमालक शेख असलम शेख फकीरा रा.पाचोरा ता. पाचोरा जि. जळगाव असे नमुद चार आरोपीविरुध्द पोलिस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गोवंशीय जातीचे १७ बैल हे त्यांच्या जिवीताच्या काळजीने गोशाळा येथे पुढील पालन पोषणाकरीता दाखल करण्यात आले आहेत. ही कामगीरी पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलिस अधिक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराव धरणे आणि पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक के. वि. केजगीर, हवालदार विशाल माळवे, अदनान पठाण यांनी पार पाडली आहे.

दै. सकाळ

# कत्तलीसाठी जाणाऱ्या १७ गोवंशांची सुटका

## वाहनासह चौघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**सकाळ वृत्तसेवा**

भाग्यनगर, ता. ४ : ऑपरेशन फ्लश ऑऊट अंतर्गत भाग्यनगर ठाण्याच्या पोलिसांनी बुधवारी (ता.४) कत्तलीसाठी गोवंशीय घेऊन जाणाऱ्या वाहनास पकडून १७ बैलांची सुटका केली.

गाडीचालक शेख अय्युब शेख युसुफ (रा. चौपाल मोहल्ला नशीराबाद ता. जि. जळगाव), हेल्पर फरीद नबी कुरेशी (रा. वाघारी ता. जामनेर जि.जळगाव) व शेख मुक्तार शेख अब्बास (रा. आयशानगर ६५ मालेगाव ता.जि. नाशिक), बैलमालक शेख असलम शेख फकीरा (रा.पाचोरा ता. पाचोरा जि. जळगाव) असे संशयित चार आरोपींविरुद्ध भाग्यनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना अवैध धंद्यावर कारवाईबाबत आदेशित केले होते. त्याअनुशंगाने भाग्यनगर ठाण्याअंतर्गत बुधवारी (ता.४) गुन्हे शोध पथकाचे पोलिस उपनिरिक्षक केजगीर यांनी पूर्णा कडून नांदेडकडे येणारा एका आयशर वाहनात कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे नेत आहेत, अशी खात्रिशीर माहिती मिळाल्याने त्यांनी सदर माहिती देवून सोबत त्यांनी अमलदार माळवे, पठाण यांना घेवुन पूर्णा ते नांदेड येणारे रोडवर जय भवानी चौकाजवळ सापळा रचला.

पहाटे १.४५ वाजेच्या सुमारास आयशर क्रमांक (एम.एच.२८ बीबी ४९४४) थांबवून पाहणी केली असता आत १७ गोवंशीय जातीचे बैल दिसून आले. वरील चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एकुण २२ लाख ८५ हजाराचा मुद्देमाल जप्त करुन १७ बैलं गोशाळा येथे पुढील पालनपोषणासाठी दाखल करण्यात आले. या कारवाईमुळे गोवंशांची तस्कारी करणाऱ्यांना चाप बसणार आहे.